# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३

**स्मरणपत्र**

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/जाप्रप/२०१७/625

दिनांक :- 14 MAR 2017

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व पदवी व पदव्यूत्तर पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता राखीव प्रवर्गात प्रवेश घेणा-या उमेदवारांच्या प्रमाणपत्र पडताळणीबाबत.**

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/अज/२०१६/२९११ दिनांक २९ ऑगष्ट २०१६.
२. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २अ/एडीएम/जात पडताळणी/२०१६/०५ दिनांक ४ जानेवारी २०१७.
३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं १ नागपुर विभाग, नागपुर यांचे पत्र क्रमांक :- विजाप्रपसक्र १/सत्या.अह/३०३५/२०१६ दिनांक १/१२/२०१६.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयाचे संदर्भ पत्र क्रमांक १ अन्वये आपल्या संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये संचालनालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश देण्यात आलेल्या राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र,अपंगत्व प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्रे निर्गमित केलेल्या सबंधित प्राधिकरणाकडे पडताळणीकरीता पाठवुन सत्यता पडताळणी करण्याबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या होत्या. तसेच मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे संदर्भ २ चे पत्रान्वये व त्यासोबत जोडलेल्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १ नागपुर विभाग, नागपुर याच्या संदर्भिय पत्राची प्रत सोबत जोडुन पाठविण्यात येत आहे. संदर्भिय पत्रान्वये जिल्हास्तरीय जात पडताळणी प्रमाणपत्र समित्या स्थापन करण्यात आलेल्या असुन विद्यार्थ्यांचे जातीचे प्रमाणपत्र ज्या जिल्हयातील असेल त्या जिल्हयात कार्यरत असलेल्या जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे वैधता प्रमाणपत्रे तपासणीसाठी पाठविण्यात येवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत कळवून सुध्दा अहवाल अद्यापही अप्राप्त झाले.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करावा. याविषयी भविष्यात काही प्रश्न उद्‌भवल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य यांची राहील, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना सकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.